बालचरित व वैष्णवधर्म

सुचित्रा शरद ताजणे

असिस्टंट प्रोफेसर संस्कृत विभाग, मुंबई विद्यापीठ,कलिना, सांताक्रुज (पूर्व)

सारांश:

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय भासांचे बालचरित असून त्याद्वारा वैष्णव धर्माचे पडसाद कसे दिसतात त्याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.



कालिदासाच्या साहित्याकडे बघितले असता शैवधर्मातील पाशुपत संप्रदायाचे उल्लेख आढळतात जसे: वागर्थविव संपृक्तौ वागर्थ प्रतिपत्तये|

जगतं पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ||

इथे कालिदासात अर्धनारीश्वरसंप्रदाय दिसतो तर भासांच्या वैष्णव भक्त असण्याचा पुरावा त्यांच्या साहित्यातील पुराव्यांवरुन मांडता येतो , जसे बालचरित. वैष्णव धर्माकडे बघितले असता आपल्याला दिसते ती विष्णूची पूजा .बालचरितातही कृष्ण हा विष्णूचा अवतार आहे हे स्पष्ट मत मांडून कृष्णाच्या उपासनेचा मार्ग लोकांना दाखविला. हरिवंशपुराणातही विष्णू पर्वामध्ये कृष्ण भक्ती ओसंडून वाहतांना दिसते.

कृष्ण -पुरुषोत्तम -विष्णू हयाची प्रतीती न येता विष्णू = कृष्ण असे समीकरण दिसते. यान खोंडा हयांच्या उपासनेतून दर्शनाकडे हे मत गृहीत धरुन हरिवंशाला आरंभबिंदू मानून दर्शनाकडे जाण्याचा मार्ग चोखंदळला इ.स. पू. . ३ रे शतक पाञ्चरात्रामध्येही प्रथम नारायणाची पूजा केली जात असे व भागवत वार्ष्णेय वासुदेवाची पूजा करीत[१]. २-या-३-या शतकामध्ये भक्ती ही विष्णूच्या आधारावर केल्या जावू लागली. गीतेतील कृष्ण हा त्याचा आरंभबिंदू [२].

ई.स.पू. ४ थ्या शतकात पाणिनीच्या अष्टाध्यायी च्या सूत्रामध्ये वासुदेवाच्या उपासनेचे प्रमाण मिळते.ई.स.पू. ३- ४ शतकापासून १ल्या शतकापर्यन्त वासुदेवोपासनेचे प्रमाण सापडतात[३].

ई.स.पू. ४ थ्या शतकातील भासएक चतुरस्र विद्वान होता.भासाने वेद, इतिहास-पुराणे, कथा-गाथा, तसेच धर्म, अर्थ,राजकारण, साहित्य,इ.शास्त्रांचे त्याने बरेच अध्ययन केले होते.ते स्वभावाने नम्र,विनोदी होते. राम-कृष्णावर त्यांची

[1]भारतीय धर्म एवं दर्शन,शिवस्वरुप सहाय पान नं.६८)

[2]वैष्णइझम व शैवइझम,यान खोंडा,पान नं. २२व २४)

[3]<http://hi.brajdiscovery.org/index.php?title=**वैष्णव-धर्म**> **बघितले दि.२०/०७/१५**

प्रगाढ भक्ती दिसते, त्यावरुन ते वैष्णव असावे असे वाटते.[४]भासाचा धर्म व त्यांचे जातिकुल हे सनातन वैदिक धर्माचे असून यांचा सात्वत(भागवत) धर्म असावा.तसेच हे ब्राम्हण असून विष्णूभक्त (कृष्णभक्त) असावे.[५]

बालचरित(कृष्णकथेवर आधारित)चरित्रात्मक नाटक रचतांना,विशेषत: चरित्रनायकाला दैवी व्यक्तिमत्त्व लाभले असताना ,कोणाही नाटककाराचे हात बांधल्यासारखे असतात. त्या व्यक्तीच्या जीवनातील घटना स्थिर झालेल्या असतात.इतिहास, पुराण किंवा परंपरा आणि लोकसमाज यांनी त्या घटनांना निश्चित रुप दिलेले असते.त्या घटना डावलणे आणि नवे प्रसंग निर्माण करणे साहित्याच्या दृष्टीने शक्य नसते.. घटनाच नव्हेत तर त्यांच्यामुळे व्यक्तिमत्वाचे जे विशेष फलित होत असतात,त्यांनाही असेच स्थिर स्वरुप आलेले असते.त्यामुळे घटना-प्रसंगांची निवड करणे, त्यांच्या वेगळया कार्यकारणभावाचा शोध घेणे,किंवा त्या व्यक्तिमत्वाच्या मनाचे अज्ञात कोपरे प्रकाशात आणणे, एवढयापुरतेच कलात्मक स्वातंत्र्य लेखकाला घेता येते. नाटयरचनेच्या दृष्टीने नवीन पात्रांची किंवा काही प्रसंगांची निर्मिती केली तरी ती चरित्रनायकाच्या एकंदर जीवनाशी सुसंगती साधणारी, कालदृष्टया संभाव्य वाटणारी अशीच असावी लागते.

बालचरिताची रचना करताना या मर्यादा भासाला सांभाळाव्या लागल्या आहेतच आणि हे नाटक वाचताना आपल्यालाही त्या विसरुन चालणार नाही. कृष्णाचे बालजीवन अनेक अद्भूत गोष्टींनी भरलेलेआहे.कारण कृष्ण हा श्रीविष्णूचा अवतार होय ही श्रद्धा फार प्राचीन काळापासून रुजलेली आहे.[६]या श्रध्देचा आदर करायचा म्हणजे श्रीकृष्णाजीवनावरील नाटकात अद्भुताचा अंश फार मोठया प्रमाणात येणार हे उघड आहे. भासाने दामोदराला ईश्वरी अवतारच मानलेले आहे आणि विशेष म्हणजे या दैवीपणाची जाणीव स्वत: दामोदरालाही आहे.[७]कृष्णकथा आज जी मिळतो ती पुराणग्रंथामधून .हरिवंश व भागवत हे या कथेचे मोठे आधार असल्याचे आपल्याला दिसते.यदायदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। धर्मसंस्थापनार्थाय तदा संभवति प्रभु:।।[८]

ज्याप्रमाणे एखादया अगाध सरोवरातून हजारो छोटेछोटे पाट बाहेर येतात.त्याप्रमाणे भगवंताच्या विश्वव्यापक स्वरुपातून असंख्य अवतार पृथ्वीवर येतात, असे भागवतात व हरिवंशात म्हटले आहे [९]

शंङखक्षीरवपु: पुरा कृतयुगे नाम्ना तु नारायण -

स्त्रेतायां त्रिपदार्पितत्रिबुवनो विष्णु: सुवर्णप्रभ:।

दूर्वाश्यामनिभ: स रावणद्यधे रामो द्वापरे

नित्यं योऽञ्जनसन्निभ: कलियुगे व: पातु दामोदर:।।[१०]

---

[4]भारतीय संस्कृतिकोश सहावा खंड,पृष्ठ ५१९संपादक:पं. महादेवशास्त्री जोशी भारतीय संस्कृतीकोश मंडळ,४१०,शनिवारपेठ, पुणे.)

[5](भासांची नाटके अर्थात भासकवीचा मराठीत अवतार)तृतीय गुच्छ,मुद्रक व प्रकाशक-शंकर नरहरजोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ,पुणे.१९३१.)

[6]भारतीय संस्कृतिकोश , खंड २, संपादक:पं. महादेवशास्त्री जोशी भारतीय संस्कृतीकोश मंडळ,४१०,शनिवारपेठ, पुणे.

[7]बालचरित,गो.के.भट,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई

[8]हरिवंश ,हरिवंश प.१.४१.१६

[9]भाग.पु.१.३.६:,हरिवंश१.४१.४१

[10]बालचरित१.१

पूर्वी कृतयुगामध्ये शंख व दूध यांच्यासारखी (धवल कांती) असलेला ,ज्याला नारायण नावाने ओळखीत, त्रेतायुगात,तीन पावलांनी तिन्ही भुवने व्यापणारा सुवर्णप्रभा असलेला,जो विष्णू,द्वापारयुगात,दूर्वाप्रमाणेनील कांतीचा ,रावणवधाच्या प्रसंगी जो राम कलियुगातील काजळासारखा ,तो दामोदर तुमचे रक्षण करो।

भासांच्या या सूत्रधाराकडून म्हटल्या गेलेल्या श्लोकातून आपल्याला देवांच्या अवताराविषयीचे ज्ञान होते.व भासांचा अवतारसृष्टीवर विश्वास होता असे म्हणण्यास बाधा येत नाही. हयाचे कारण आपल्याल हरिवंशातच दिसते. ज्याप्रमाणे एखादया अगाध सरोवरातून हजारो छोटेछोटे पाट बाहेर येतात.त्याप्रमाणे भगवंताच्या विश्वव्यापक स्वरुपातून असंख्य अवतार पृथ्वीवर येतात, असे भागवतात व हरिवंशात म्हटले आहे[११]

तद् भगवन्तं लोकादिमनिधनमव्ययं लोकाहितार्थे कंसवधार्थे वृष्णिकुले प्रसूतं नारायणं द्रष्टुमिहागतोऽस्मि।[१२]

भासांनी नारदाच्या आगमनाविषयी सूचन करताना म्हटले की लोककल्याणार्थ कंसवधाच्या हेतूने वृष्णिकुळात जन्म घेतलेल्या अनादि, अनंत, शाश्वत अशा भगवान नारायणांना डोळयांनी पहावे म्हणून मी इथे आलो आहे.

ज्ञात्वा विष्णुं क्षितिगतं भागांश्च त्रिदिवौकसाम्।

विनाशशंसी कंसस्य नारदो मथुरां ययौ।[१३]

हरिवंशपुराणातही हाच दाखला मिळतो की, विष्णूचा अंश पृथ्वीवर गेला आहे असे पाहून कंसाच्या नाशाची इच्छा करणारे नारद मथुरेला गेले.

ज्यांच्या पराक्रमाला अंत नाही, असुरांच्या पराक्रमाचा ज्यांनी नाश केला आहे देवंच्या स्वामीचेही जे स्वामी ,त्रैलोक्याची पताका, जगताचे निर्माते, सर्व प्राणिमात्रांचे पोषणकर्ते, कमलाप्रमाणे दीर्घ नेत्र असलेले, जे पुराण पुरुष हेच ते प्रत्यक्ष भगवान नारायण.

मनुष्यलोकाविषयी प्रेम असणा-या आणि त्याच्या रक्षणासाठी तत्पर असणा-या जगताचे प्रतीक, कमलाप्रमाणे स्वच्छ नेत्र असलेले, रावणाचे तेज भ्रंश करणारे राम,अशा पराक्रमाचे माहेरघर असणा-या ऊत्कृष्ट वीराला,नारायणाला हा नमस्कार.

जन्माच्यावेळी घडलेले शुभशकुन पुष्पवृष्टी खाली पडत आहे.देवतांच्या दुदुंभि निनादत आहेत. वृष्णिकुळामध्ये जन्म घेतलेल्या हरीला बघण्यास नारद येथे आले.

यदर्थं भगवान विष्णुः सुरेशो रिपुसदनः।

देवलोकं समुत्सृज्य वसुदेवकुलेऽभवत्।।

हितार्थं सुरमर्त्यानां लोकानां प्रभवाय च।

बहुशः सर्वभूतात्मा प्रादुर्भवति कार्यतः।।[१४]

---

[11]भाग.पु.१.३.६:,हरिवंश१.४१.४१

[12]बालचरित . १

[13]हरिवंशपुराण-विष्णुपर्व१.१

[14]हरिवंश प१.४१.१२व१)

आकाशात वीज लोळते आहे प्रचंड वावटळीत गरगरणा-या नवमेघांच्या कडकडाटांनी पृथ्वी गदगदा कापते आहे आणि इकडे जगात तर असुरांच्या मेळाव्याचा नाश करणारा विष्णू प्रजाजनांचे रक्षण करण्याच्या उदेशाने अवतीर्ण झाला नाही ना? असे वसुदेवाच्या तोंडी घातलेले संवाद तसेच रावणाला रात्री ला झालेल्या वातचक्र ,भूमिकंप, उल्कापात आणि देवतांच्या प्रतिमा या स्वप्नभासाबाबत राजज्योतिषी व पुरोहितांचे मत कांचुकीय सांगतो.नभस्तली राहणारे सनातन भूत तत्त्व काही विशेष कार्यासाठी इथे या नरलोकावर अवतार घेत असते, आकाशदुदुंभिच्या घोषांनी आणि भूमिकंपाने त्यांच्या अवतारवेळी हा विशेष प्रकटविणारा परिणाम घडून येतो .हया सर्वामधून आपल्याला भगवंताच्या अवताराविषयी सांगतांना भासांनी सांगितलेल्या गोष्टी म्हणजे जन्माच्यावेळी घडलेले शुभशकुन ,पुष्पवृष्टी खाली पडत आहे. देवतांच्या दुदुंभि निनादत आहेत. वृष्णिकुळामध्ये जन्म घेतलेल्या हरीला बघण्यास नारद येथे आले या व हरिवंशातील अवतारांमध्ये साम्य दिसते.कारण

सागरास्समकम्पन्त चेलुश्च धरणीधरा:।

जज्वलुश्चाग्नयश्शान्ता जायमाने जनार्दने।।

अर्थात भगवंताच्या जन्मावेळी समुद्र कंपित झाला,शांत अग्निज्वाळा परत पेटल्या.,दुदुंभि वाजू लागली , पुष्पवर्षाव होऊ लागला. ।।[१५]पौराणिक उपासना ही सगुणोपासना आहे आणि तिला अवतारवादाचा आधार आहे. अवतारकल्पना ही पौराणिक धर्माला मूलाधार अशी आहे, असे म्हटले तरी चालेल.अधर्माचा उच्छेद व धर्माची संस्थापना हे अवतारांचे प्रधान कार्य होय. अनीती व अधर्म यांच्या आक्रमणामुळे जेव्हा जगातली विद्यमान नैतिक व धार्मिक व्यवस्था उद्ध्वस्त होते,जेव्हा प्रकाशाच्या जागी अंधकाराचे, सत्याच्या जागी असत्याचे व धर्माच्या जागी अधर्माचे साम्राज्य प्रस्थापित होते त्यावेळी करुणामय भगवान कोणत्या तरी रुपाने भूतलावर अवतीर्ण होऊन धर्माची विस्कटलेली घडी पुनश्च नीट बसवतो,

हे प्रतिबिंब भासांनी वर्णन केलेल्या अरिष्टर्षभाच्या मते कृष्णाला भीति वाटत नाही याचे कारण कृष्ण स्वत:सांगताना दिसतात ते म्हणतात की, भ्यालेल्यांना अभय देण्यासाठी तर मी या पृथ्वीतलावर जन्म घेतलेला आहे.तसेच अरिष्टर्षभ म्हणतो की,जिथे जिथे आम्ही जन्म घेतला तिथे तिथे दानवांचा वध करण्यास्तव त्रैलोक्याचा संरक्षक मधुसूदन प्रकट होतो .तसेच विष्णूच्या हातून मेलो तर मला अक्षय लोक प्राप्त होईल.अशाप्रकारे भगवंताचा अवतार हा मानवाला देव बनविणे, त्याच्या अंतरात इशतत्वाची स्थापना करुन मोक्षमार्गाकडे त्यांचे उन्नयन करणे हे कार्यही करते.

कृष्णाने पूतनेला मारले, कालीयाचा पराभव इ. सर्वांचे मृत्यू कंसाला झालेले आठवले[१६]

देवकी च यशोदा च सुषुवाते समं तदा ।यामेव रजनीं कृष्णो यज्ञे वृष्णिकुलोद्वह:। तामेव रजनीं कन्यां यशोदापि व्यजायत।।मुहूर्तेऽभिजिति प्राप्ते सार्ध्दरात्रे विभूषिते।।[१७]

फरक फक्त एवढाच दिसतो की ,भासांनी वसुदेवपुत्राची अदलाबदल करण्यास जातात तेव्हा देवकी ही शुद्धीवर असते तर हरिवंश पुराणात योगमायेमळे तिला काही माहितीच होत नाही. इथे मनुष्यसुलभ पुत्रप्रेमाची व्याकुळता दाखविण्याचा कदाचित भासांचा प्रयत्न दिसतो.तसेच योगमायेच्या मुळे यशोदेजावळून मुलीला उचलून देवकीकडे वसुदेव ठेवतो तर भासांच्या बालचरितात वसुदेव मृत मुलीला नेणा-या नंदगोपाला आपला मुलगा देउन मृत मुलगी घेतो.ती मुलगीही कात्यायनी असल्याचे हरिवंशातही सांगितले आहे.ज्यावेळी कंस तिला शिळेवर आपटतो तेव्हा ती आपले खरे रुप प्रकट करुन कंसाला मृत्यू अटळ असल्याचे सांगते.

[15]हरि,पु.वि.प.३.१४-१९)

[16]हरिवंश ,विष्णुपर्व २२अ. १-६ पान नं २५१

[17]हरि,पु.वि.प.३.१२-१४)

त्वं हि सिद्धिधृति: कीर्ति: श्रीविद्या सन्नतिर्मति:।

संध्या रात्रि: प्रभा निद्रा कालरात्रिस्तथैव च।

आर्या कात्यायनी देवी कौशिकी ब्रम्हचारिणी।।

'.....

बहुरुपा विरुपा च अनेकविधिचारिणी।।।[१८]

कृष्णाच्या दैवत्वाला उज्वलता व प्रखर रुपात दाखविणासाठी भासांनी हया कात्यायनीच्या सर्व शस्त्र परिवाराला मानवी रुप देऊन कृष्णाच्या कार्यासाठी मदतनीस म्हणून आम्ही कार्य करणार आहोत वासुदेवस्य कार्यार्थं प्राप्ता: पारिषदा: वयम्।।(बा.च.१-२७)हे स्पष्टपणे मांडले आहे .ज्यामुळे कृष्णाच्या देवत्वाची आधिक्याने प्रचिती येते. भासांनी तिस-या अंकामध्ये कृष्णजन्मामुळे नंदगोपाच्या वृंदावनात सुख-समृद्धीची रेलचेल झाली असे सांगतात व वृद्ध गोपालकाद्वारे कृष्णाच्या बाललीलारुपी अद्‌भुत पराक्रमाच्या गोष्टी वर्णन करुन सांगतो.ज्यामध्ये

१. पूतना
२. शकट
३. धेनुक,
४. केशी इ.दानवांचा वध केला
५. यमलार्जुनाला पाडले.
६. संकर्षण (बलदेवाने)प्रलम्ब नामक असुराला मारले.

हया सर्व गोष्टी हरिवंशपुराणातूनच घेतल्या म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अपर: केशवस्यायं प्रादुर्भावो महात्मन:।

विख्यातो माथुरे कल्पे सर्वलोकहिताय वै।।

यत्र शाल्वं च मैन्दं च द्विविदं कंसमेव च।

अरिष्टमृषभं केशिं पूतनां दैत्यदारिकाम्।।

नागं कुवलयापीडं चाणूरं मुष्टिकं तथा।

दैत्यान्मानुषदेहस्थानसूदयामास वीर्यवान्।[१९]

हरिवंश पुराणातील हरिवंश पर्वामध्ये असणा-या अवतारवर्णन नामक ४१व्या अध्यायात कृष्ण अवताराचे वर्णन करतांना त्यांनी केलेल्या वध कार्याची माहिती दिली. ज्यामध्ये शाल्व, मैद, कंस, द्विविद ,अरिष्ट, वृषभ, केशी, पूतना कूवलयापीड,चाणूर, मुष्टिक व मनुष्य देहामध्ये स्थित दैत्यांना मारले.

हरिवंशाच्या विष्णूपर्वातील ३-या अध्यायापासून २९व्या अध्यायापर्यंत हया सर्वाची माहिती दिसते. विष्णू पर्वामध्ये श्रीकृष्णचरित्रास प्रारंभ झाला आहे.

श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारित भासलिखित बालचरितातील प्रथम अंकामध्ये केलेले भगवंताच्या जन्माच्या वेळचे वर्णन असे:

[18]हरि,पु.वि.प.३.१-५

[19]हरिवंश पु ,हरिवंशपर्व१.४१.१५६-१५८

प्राणघात,मृत्यू,जीवावरचे प्रसंग,रात्र, व स्वप्न दृश्य हे सर्व नाटयशास्त्राच्या संकेतबाहय दृश्ये व मृत्यू बंडखोर भासांच्या इतर नाटकामध्येही दिसते .

वसुदेव नंदगोपाला उपकाराची आठवण करुन देतांना म्हणतात की, तस्य प्रत्युपकारस्य कालस्ते समुपागत:। धन्याच्या खाल्लेल्या अन्नाची परतफेड करण्याची ही वेळ आली आहे लवकर धावत या असे कंस वधाची वेळ जवळ आली असतांना वृष्णिसैनिकांना पडदयाआतून ५व्या अंकामध्ये आवाज दिल्या जातो.ज्यावरुन आपल्याला भासांच्या विवेचक बुद्धीने उपकारांची परतफेड करणे हे चांगले असते.

अशौचितोस्मि,मृता दारिका गृहीता। यमुनाजलं गत्वा शौचं करोमि।तेव्हा वसूदेव नंदगोपाला घोषवासात् प्रकृत्या शुचिरेव भवान्। गवळीवाडयात राहत असल्यामुळे तुम्ही पवित्रच आहात असे सांगतात.

दुस-या अंकामध्ये वसुदेवाच्या वाक्यामधून भय आणि अभय अशा दोन्ही अवस्था पैकी काहीही असले तरीही बोलावण्याप्रमाणे राजाकडे जाणे भाग पडते हयामध्ये भासांनी राजकीय नीतिचे चित्रण केले आहे.तर वसुदेवाच्याच पुढच्या वाक्यामधून माझ्या सारख्यालाही खोटे बोलण्याची वेळ येणार आहे, पण कुमाराचे रक्षण करण्यासाठी खोटेसुदधा खरे म्हणावे. यामधून एखादयाच्या भल्यासाठी खोटे बोलावे लागले तर त्यात काही गैर नसते हे सांगण्याचा भासांचा हेतू दिसतो.

२-या अंकाच्या सुरवातीला कंसाच्या तोंडी खालील उक्ती दिसतात की पृथ्वी कंप पावते आहे,भव्य प्रासाद कोसळून पडतात,तर या निमित्तांच्या महत्वाच्या गुणांची आणि कर्माची फळे भोगायला पाहिजे.यामध्ये कंसाला केलेल्या कर्माची काहीएक फळे याच जन्मामध्ये भोगावी लागणार हे निश्चित आहे

५व्या अंकामध्ये भासांनी कंसाच्या पूर्वजन्माविषयी दामोदराच्या तोंडून सांगितले की, पूर्वजन्मात असुर असलेल्या क्षुद्र कंसाला युध्दामध्ये खाली पाडून जोवर मी ओढीत नेत नाही तोवर मर्त्य जनांत माझा हा जन्म फुकट आहे, आणि गौळवाडयात मी केलेली ती कृत्ये या नगरात धीर देण्यासारखी नाहीत हयावरुन भासांनी जसे इतर नाटकांमध्ये दुष्ट वाली,रावण दुर्योधन ,कैकेयी या स्वभावरेखांच्या बाबतीत कलात्मक प्रयत्न करुन सुष्टतेच्या रुपात मांडले तसे कंसाचे दुष्टपणाचे चित्रण करतांना भासांनी ते पूर्वजन्मावर व मधूकत्रषीच्या शापामुळे युक्त केले आहे. आपल्या धर्म आणि संस्कृतीप्रमाणे पूर्वजन्म व कर्म याबद्दलचे जे तत्वज्ञान आहे त्याप्रमाणे एखादया जीवनातील माणसाचे वर्तन या पूर्वजन्मामुळे निश्चित होते त्याची पावले बांधल्यासारखी पडत असतात.या जीवनातील माणसाचे कृत्ये हेतुपूर्वक केलेली नसतात तर अटळ नियतीच्या सामर्थ्यामुळे पूर्वजन्मीच्या प्रभावामुळे व शापाच्या परिणामामुळे घडतात .त्यामुळे त्याचे स्वत:चे जीवन हे पूर्वीच्या अनिवार्य संकेतांमळेच सदोष होतात.या तत्वज्ञानाची बैठक समजली म्हणजे लक्षात येते की , कंस हा नियतीच्या पंजात अडकलेला एक दुर्दैवी प्राणी आहे. नियती हीकठोरपणे त्याला विनाशाकडे खेचून येत आहे म्हणजे हेतूपूर्वक दुष्ट कृत्ये करणा-या माणसापेक्षा ,नियतीचा बळी झालेला एक दुर्दैवी माणूस ,असा रंग कंसाच्या चित्रणात भासाने भरला आहे.

वैष्णव संप्रदाय हा हिंदूच्या सांस्कृतिक जीवनातील एक प्रमुख अंग आहे सर्व मानवजातीला आत्मविकासासाठी परमात्मप्राप्तीसाठी अत्यंत सुलभ असा भक्तिमार्ग सर्वप्रथम या वैष्णव संप्रदायात उपलब्ध झालेला आहे. श्रीविष्णूची किंवा विष्णूचा अवतार मानलेल्या देवतेची भक्ती करणारा भक्त सर्व भूतमात्रांकडे समत्वदृष्टीने पाहतो.[२०]याचे प्रत्यंतर कंसाच्या वाइट कृत्यांनासुदधा भासांनी मधूक ऋषीचा शाप,व पूर्वजन्मावर नेले आहे या भासाच्या कथानकात दिसते. ज्याच्याद्वारे त्यांच्या समत्वदृष्टीचा भाग आपल्याल्या आढळतो. भासांच्या बालचरितातच नव्हे तर त्यांच्या सर्व साहित्यातून हे आढळते. वैष्णवधर्माच्या समन्वयवादाच्या प्रतीकरुपाचे दर्शन त्यांनी जो दुष्टांना सुष्टतेचा मुलामा चढवला आहे त्यामध्ये दिसते.

[20]भारतीयसंप्रदाय-भक्तीकोश तृतीय खंड, विद्यावचस्पति शंकर वासुदेव अभ्यंकर,आदित्य प्रतिष्ठान,पुणे प्रथमावृत्ती २००१

वैष्णव पंथातील उदार आणि व्यापक तत्वप्रणालीमुळे समाजातील कोणत्याही स्तरात जीवन कंठणारा माणूस आत्मविकास घडवून आणण्यास मुक्त असतो. ज्या सर्वश्रेष्ठ भक्तितत्वावर हा पंथ उभा राहिलेला आहे. त्या भक्तितत्वाला मूर्तस्वरुप निश्चितपणे केव्हा प्राप्त झाले हे सांगणे कठीण आहे. तरीही वैदिक काळातील आर्यांच्या कालखंडात सृष्टिनिर्मित प्रत्येक घटनेवर देवत्वाची भावना आरोपित करुन देवतेला प्रसन्न करुन घेण्यासाठी यज्ञादि कर्मे वा प्रार्थना केली जाई यामागे त्यांची श्रद्धा नि:संशय प्रेरक ठरली होती.

संदर्भ ग्रंथ:

१. जोशी महादेवशास्त्री, *भारतीय संस्कृतिकोश सहावा खंड,* भारतीय संस्कृतीकोश मंडळ,४१०,शनिवारपेठ, पुणे, पृष्ठ ५१९.

२. नरहरजोशी शंकर, *भासांची नाटके अर्थात भासकवीचा मराठीत अवतार* तृतीय गुच्छ, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ,पुणे.१९३१.

३. जोशीमहादेवशास्त्री *भारतीय संस्कृतिकोश , खंड २,* भारतीय संस्कृतीकोश मंडळ,४१०,शनिवारपेठ, पुणे.

४. भट गो.के.*बालचरित,* ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.

५. अभ्यंकर शंकर वासुदेव, *भारतीयसंप्रदाय-भक्तीकोश तृतीय खंड,*आदित्य प्रतिष्ठान,पुणे प्रथमावृत्ती २००१.

६.वैष्णइझम व शैवइझम,यान खोंडा,पान नं. २२व २४

७. सहाय शिवस्वरुप , *भारतीय धर्म एवं दर्शन,* मोतीलाल बनारसीदास ,दिल्ली,२००६,पान नं.६८

८.पाठकशास्त्री दा.प्र. व रा.शं. नगरकर ,*महाभारत खिलपर्व (हरिवंश उत्तरार्ध),* विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे १९८६.

सुचित्रा शरद ताजणे

असिस्टंट प्रोफेसर संस्कृत विभाग, मुंबई विद्यापीठ,कलिना, सांताक्रुज (पूर्व)